(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

<u>वनजमिन-नागपूर</u>

अध्यक्ष, सिद्धार्थ गौतम बुद्ध, शिक्षण व संस्कृती समिती, नागपूर यांना वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मौजे पिटेसूर रिठी गोधणी येथील सर्व्हे क्र.७३ मध्ये विहीर खोदणे व पाईपलाईन टाकण्याकरीता ०.०४५ हेक्टर झुडपी जंगल वनजमिन वळतेकरणाबाबत.

# महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**

**शासन आदेश क्रमांक : एफएलडी- ३४९७/ प्र.क्र.१७४/ फ-१०**

**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**दिनांक :- २२/०६/२०१६.**

**वाचा :-**

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एनसी/आय/१४८६/१९९७-१९९८, दिनांक २१/०८/१९९७.

२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे पत्र समक्रमांक, दिनांक १०/०२/१९९८.

३) पर्यावरण व वन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम क्षेत्र, भारत सरकार, भोपाळ यांचे पत्र क्र.८-बी/१७/१९९८-एफसीडब्ल्यू/२५४६, दिनांक २४/१०/२००२.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/नोसेल/१/आयडी-१८३४ (२)/१७९२/१२-१३, दिनांक ०७/११/२०१२.

**आदेश :-**

ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी अध्यक्ष, सिद्धार्थ गौतम बुद्ध, शिक्षण व संस्कृती समिती, नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेला मौजे पिटेसूर रिठी गोधणी येथील सर्व्हे क्र.७३ मध्ये विहीर खोदणे व पाईपलाईन टाकण्याकरीता ०.०४५ हेक्टर झुडपी जंगल वनजमिन वळती करण्याचा प्रस्ताव राज्य शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रानुसार सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, सदर योजना ही भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम,१९८० आणि त्या अंतर्गत जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार स्थळ विवक्षित (site specific) आहे, तसेच सदर योजनेसाठी पर्यायी वनेत्तर जमिन उपलब्ध नसल्याची बाब विचारात घेण्यात आली;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये या प्रस्तावाची काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ अन्वये ०.०४५ हेक्टर वनजमिन वळती करण्याची भारत सरकारला शिफारस केली आहे;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर नीट विचार करुन, राज्य शासनाने वन (संवर्धन), अधिनियम, १९८० च्या कलम-२ खाली सादर केलेल्या प्रस्तावास वरील अ.क्र.-३ अन्वये मंजूरी दिलेली आहे. ही मंजूरी भारत सरकारच्या दिनांक २४/१०/२००२ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल याच्या अधीन राहून प्रदान केली आहे;

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-४ येथील पत्रान्वये प्रकल्प यंत्रणेने पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांच्या दिनांक २४/१०/२००२ रोजीच्या पत्रातील अटींची पूर्तता केली असल्याचे कळविले आहे;

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प यंत्रणा म्हणजेच अध्यक्ष, सिद्धार्थ गौतम बुद्ध, शिक्षण व संस्कृती समिती, नागपूर यांना मौजे पिटेसूर रिठी गोधणी येथील सर्व्हे क्र.७३ मध्ये विहीर खोदणे व पाईपलाईन टाकण्याकरीता खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे संदर्भ क्र.१ येथील पत्रानुसार सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशीलात नमूद केलेली ज्यामध्ये, झुडपी जंगल वनजमिन समाविष्ट आहे, अशी एकूण ०.०४५ हेक्टर वनजमिन या प्रस्तावासाठी वळती करण्यात यावी. हे वळतीकरण भारत सरकारच्या दिनांक २४/१०/२००२ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या पूर्ततेनंतर पूर्ण करण्यात यावे;

१. वर नमूद केलेल्या भारत सरकारच्या मान्यता आदेश पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर हे खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.
२. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना, भारत सरकारच्या दिनांक २४/१०/२००२ रोजीच्या पत्रातील अटी आणि या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.
३. उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non-compliance) संबंधित मुख्य वनसंरक्षक/उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक २५/१०/१९९२ रोजी

निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

**अनुसूची**

| अनु.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | सर्व्हे नंबर/ कंपार्टमेंट नंबर | वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पिटेसूर | नागपूर | नागपूर | ७०, ७३ | ०.०४५ | झुडपी जंगल |

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०६२२१११८३४६८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2016.06.22 11:25:09 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)

**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

प्रत- टप्पा-१ व टप्पा-२ च्या मंजुरी आदेशासह वरील आदेश आपल्या वेबसाईटवर अपलोड करण्याच्या विनंतीसह :

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.

**प्रत :-**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर.

९. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर.
१०.जिल्हाधिकारी, नागपूर.
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
१२.उप वनसंरक्षक, नागपूर.
१३.अध्यक्ष, सिद्धार्थ गौतम बुद्ध, शिक्षण व संस्कृती समिती, पी.एन.राजभोग इंस्टिट्यूट ऑफ कोचिंग, गोरेवाडा, नागपूर.
१४.निवडनस्ती (फ-१०).

२. जिल्हाधिकारी, नागपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर व उप वनसंरक्षक, नागपूर यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. अध्यक्ष, सिद्धार्थ गौतम बुद्ध, शिक्षण व संस्कृती समिती, पी.एन.राजभोग इंस्टिट्यूट ऑफ कोचिंग, गोरेवाडा, नागपूर यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत, व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर व उपवनसंरक्षक, नागपूर यांना पाठवावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

**<u>Forest Land- Nagpur</u>**
Diversion of 0.045 Ha. of Zupdi Jungle land under Forest (Conservation) Act, 1980 for digging of well and laying of pipe line in Survey No.73 of Village-Pitesur Rithi Godani in favour of The Chairman, Siddharth Gautam Shikshan & Sanskriti Samiti, Nagpur in Nagpur District of Maharashtra.

**Government of Maharashtra**

**Revenue and Forest Department**

**Government Order No. FLD-3497/ C.R.174/ F-10**

Mantralaya, Mumbai - 400032.

Date: - 22/06/2016

**Read :-**

1) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/I/1486/1997-1998, dated 21/08/1997.
2) Letter from Government of Maharashtra of even No. dated 10/02/1998.
3) Letter from Ministry of Environment & Forests, Regional Office, Western Region, Government of India, Bhopal No.8-B/17/1998-FCW/2546, dated 24/10/2002.
4) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/I/I.D.-1834(2)/1792/12-13, dated 07/11/2012.

**Order :-**

Whereas, the Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at serial number 1 above has submitted a proposal to the State Government, which has been received from The Chairman, Siddharth Gautam Shikshan & Sanskriti Samiti, Nagpur for diversion of 0.045 Ha. of Zudpi Jungle land for digging of well and laying of pipe line in Survey No.73 of Village-Pitesur Rithi Godani, Tehsil- Nagpur, District- Nagpur;

AND whereas, as per Forest (Conservation) Act, 1980 and guidelines issued thereunder the project is site specific and absence of alternative land for laying of pipe line was considered;

AND whereas, Government of Maharashtra, vide letter referred at serial number 2 after careful scrutiny and consideration, has recommended it to the Government of India to divert the 0.045 Ha. of forest land for the above project under section 2 of Forest (Conservation) Act, 1980;

AND whereas, Government of India after due consideration, vide its letter referred at serial number 3 above granted approval to above proposal submitted by Government of Maharashtra for diversion of forest land under section 2 of Forest (Conservation) Act, 1980. The said approval is subject to fulfillment of certain conditions by the User Agency mentioned in its letter dated 24/10/2002;

AND whereas, The Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide letter referred at serial number 4 above has informed that, User agency has complied with conditions stipulated in Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Nagpur's letter dated 24/10/2002;

NOW, therefore, Government of Maharashtra hereby directs that the forest land area of 0.045 Ha. of consisting of Zudpi Jungle land more specifically described in the proposal submitted, vide letter mentioned at serial number 1 here in above from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur and as per details given in the Schedule given below, be diverted to the User Agency, i. e. The Chairman, Siddharth Gautam Shikshan & Sanskriti Samiti, Nagpur for digging of well and laying of pipe in Survey No.73 of Village-Pitesur Rithi Godani, Tehsil- Nagpur, District-Nagpur. The diversion shall be effected subject to the terms and conditions mentioned in the letters dated 24/10/2002 of Government of India. This approval for diversion of forest land is also subject to compliance of following conditions by the User Agency-

1. The User Agency shall comply with all the conditions stipulated in the approval letter of Government of India, referred above. The Chief Conservator of Forests (Territorial), Nagpur shall ensure the strict compliance of the conditions by the User Agency. CCF will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.
2. Non-compliance of any of the conditions mentioned in Government of India's letter dated 24/10/2002, in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly.
3. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Chief Conservator of Forests/Deputy Conservator of Forests shall report through the State Government to Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Government of India, Ministry of Environment, Forests & Climate Change, Nagpur as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on 25/10/1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

**SCHEDULE**

| Sr. No. | Name of Village | Tehsil | District | Survey No./ Compartment No. | Area (in Ha.) | Legal Status |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Pitesur | Nagpur | Nagpur | 70, 73 | 0.045 | Zudpi Jungle |

This Government Order of Maharashtra Government is available on its website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201606221118346819. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2016.06.22 11:25:27 +05'30'

**(Virendra Tiwari)**

**Chief Conservator of Forests (Mantralaya)**

Copy forwarded with request to upload this order on their website along with the Stage-I and Stage-II clearances to:

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, Western Central Zone, Nagpur.

**Copy to :-**

1. Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur.
2. Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, Nagpur.
3. Principal Secretary (Energy), I.E.& L. Department, Mantralaya, Mumbai.
4. Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai.
5. Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
7. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
8. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
9. Chief Conservator of Forests (Territorial), Nagpur.
10. Collector, Nagpur.
11. Chief Executive Officer, Zilha Parishad, Nagpur.
12. Deputy Conservator of Forests, Nagpur.
13. The Chairman, Siddharth Gautam Shikshan & Sanskriti Samiti, P.N. Rajbhog Institute of Coaching, Gorewada, Nagpur.
14. Select File, Desk F-10.

2. Collector, Nagpur, Chief Executive Officer, Zilha Parishad, Nagpur and Deputy Conservator of Forests, Nagpur are hereby directed to forward the copy of this order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this order on their notice board as well as on the notice board of local self-government bodies for the information of general public.

3. The Chairman, Siddharth Gautam Shikshan & Sanskriti Samiti, P.N. Rajbhog Institute of Coaching, Gorewada, Nagpur is hereby directed that he should publish the entire order of forest clearances granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No. etc. and along with the conditions and safe guards imposed by the Central Government while granting forest clearances in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language. Copy of the Newspapers be submitted to Chief Conservator of Forests (Territorial), Nagpur & Deputy Conservator of Forests, Nagpur.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.